

# प्रभु यीषूचे गौरवषाली दूसरे आगमन

राष्ट्रांचा न्यायनिवाडा नीतीने करावयास व ज्यांनी आपल्या जीवनांत खिस्ताचा स्विकार करून जे खिस्ती जीवन जगले/जगत आहेत, आणि ज्यांची नावें जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेली आहेत त्यांच्या बरोबर सर्वकाळ राहण्यासाठी येषू खिस्त जो 'राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू' तो पुन्हां ह्या जगांत येत आहे, कारण आज्ञाध्वनी आद्यदिव्यदूतांची वाणी व देवाच्या तुतारीचा नाद होत असतां प्रभू स्वतः स्वर्गातून उतरेल; आणि खिस्तामध्ये जें मेलेले आहेत ते पहिल्याने उठतील; नंतर जिवंत उरलेले आपण त्यांच्याबरोबर प्रभूला सामोरे होण्यासाठी मेघारूढ असे अंतराळात घेतलें जाउु आणि तसेच सदा सर्वदा प्रभू जवळ राहू.

त्या दिवसासंबंधि व त्या घटकेसंबंधि पित्याषिवाय कोणालाच ठाउुक नाही, स्वर्गातील दिव्यदूतांस नाहीं, पुत्रालाहि नाहीं. तरी चोर येतो तसा ''प्रभूचा दिवस'' येईल; त्या दिवषी आकाष मोठा नाद करीत नाहीसें होईल. सृष्टितत्वें तप्त होउुन लयास जातील, आणि पृथ्वी व तिच्यावरील गोष्टीं उघडकीस येतील. तरी ज्यामध्यें नीतीमत्व वास करितें असें नवें आकाष व नवी पृथ्वी ह्यांची, त्याच्या वचनाप्रमाणे, आपण वाट पाहत आहो.

### कोण सदा सर्वकाळ खिस्ताबरोबर राहणार नाहींत ?

मांस व रक्त ह्यांना देवाच्या राज्याचे वतन मिळत नाहीं. ज्यांचे पाप खिस्ताच्या रक्ताने धुतले गेले आहेत व जे परमेष्वराला ग्रहणीय जीवन जगतात/जगले, आणि ज्यांची नावें ''जीवनाच्या पुस्तकांत'' लिहिलेली आहेत, त्यांनाच देवाच्या राज्याचे वतन मिळेल, आणि तेच खिस्ताबरोबर सदा सर्वदा राज्य करतील. बायबलच्या 1 करिंथ 6:9–10; गलती 5:19–21; रोम 1:29–32; प्रकटीकरण 21:8; प्रकटीकरण 14:9–11 मध्ये नमूद केल्यनुसार ''अनीतिमान माणसांना देवाच्या राज्याचे वतन मिळणार नाहीं''.

### येषूचे द्वितीय आगमन व युगाची समाप्तिचे चिन्ह कोणते?

युगाच्या समाप्तिच्या समयी पुष्कळ जण ''मी खिस्त आहे'' असे म्हणतील; तुम्हांस कोणी फसवूं नये म्हणून सावध असा. तुम्हीं लढायांविषयी ऐकाल व लढायांच्या आवया ऐकाल; घाबरून जउु नये म्हणून सांभाळा; कारण असे होणे अवष्य आहे, परंतु तेवढ्यांत षेवट होत नाहीं. कारण राष्ट्रावर राष्ट्र व राज्यावर राज्य उठेल आणि जागोजागी भूमिकंप होतील, मऱ्या येतील व दुष्काळ पडतील, आणि भयंकर उत्पात व आकाषांत मोठीं चिन्हें घडून येतील. पण ह्या सर्व गोष्टी वेदनांचा प्रारंभ होय. कित्येकांचा छळ केल्या जाईल, तुमच्यावर हात टाकतील, तुम्हांला सभास्थानें व तुरूंग ह्यांच्या स्वाधीन करितील; आईबाप, भाउुबंद, नातलग व मित्र हे देखिल तुम्हांला धरून देतील आणि कित्येकांना जिवे मारतील. तरी तुमच्या डोक्याच्या एका केसाचाहि नाष होणार नाहीं. तुम्हीं आपल्या धीरानें आपले जीव मिळवाल. पुष्कळ खोटे संदेष्टे उठतील व अनेकांस फसवितील; परंतु जो षेवट पर्यंत टिकाव धरून राहील तोच तारला जाईल. सर्व राष्ट्रांस साक्षीसाठी म्हणून राज्याची ही सुर्वाता सर्व जगांत गाजविली जाईल, तेव्हां षेवट होईल.

### महान संकट/क्लेष

परंतु यरुषलेमेस सैन्याचा वेढा पडत आहे असे पाहाल तेव्हां ती ओसाड पडण्याची वेळ जवळ आली आहे असे समजा. दानिएल संदेष्ट्याच्या द्वारे सांगितलेला 'ओसाडीचा अमंगळ पदार्थ पवित्रस्थानांत'' उभा असलेला तुम्ही पाहाल तेव्हां जे यहूदियांत असतील त्यांनी डोंगरात पळून जावे. परमेष्वराच्या मंदिराच्या विनाषाची भविष्यवाणी करीत येषूंनी म्हटले असे दिवस येतील कीं , जे तुम्ही पाहत आहां त्यातला पाडला जाणार नाही असा चिऱ्या वर चिरा राहणार नाहीं. कारण 'जगाच्या प्रारंभा पसून आतापर्यंत आले नाहीं', व पुढे कधींहि येणार नाहीं असे मोठें ''संकट'' त्या काळी येईल; आणि ते दिवस कमी केले नसते तर कोणा ही मनुष्याचा निभाव लागला नसता.

त्या दिवसांतील संकटांनंतर लागलेंच 'सूर्य अंधकारमय होईल' चंद्र प्रकाष देणार नाहीं, तारे आकाषांतून पडतील, आणि पृथ्वी वर समुद्र व लाटा ह्यांच्या गर्जनेने राष्ट्रें घाबरी होउुन पेचांत पडतील तेव्हां मनुष्याच्या पुत्राचे चिन्ह आकाषांत प्रगट होईल. मग पृथ्वीवरील सर्व जातींचे लोक षोक करितील, आणि ते 'मनुष्याच्या पुत्राला आकाषांतल्या मेघांवर आरूढ होउुन पराक्रमाने व मोठ्या वैभवाने येतांना पाहतील. येषूने म्हटले कि आकाष व पृथ्वी नाहीषी होतील परंतु माझी वचनें नाहींषी होणारच नाहीत.

### खिस्ताच्या द्वितीय आगमना नंतर जे मागे राहून जातील त्यांचे काय होणार ?

ज्यांची नावें जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेली आहेत त्यांच्यासाठी तो आनंदाचा दिवस होईल, परंतु ज्यांची नावें जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेली नाहीत त्यांच्यासाठी तो विनाषाचा दिवस होईल. त्यांना प्रभु येषू आपल्या मुखातील ष्वासाने मारून टाकील आणि आपल्या दर्षनाने त्यांना नष्ट करील.

### खिस्ताचे 1000 वर्षाचे राज्य

खिस्ताच्या आगमना नंतर सैतान एक हजार वर्षांसाठी बांधला जाईल. ह्या हजार वर्षांत देवाचे पवित्रजन खिस्ताबरोबर राज्य करतील. ह्यापुढे मरण नाहीं, आणि सगळे लोक आनंदाने व सुखसमाधानाने राहतील, कारण षांतीचा राजकुमार त्यांच्या बरोबर राज्य करील. खिस्ताच्या एक हजार वर्षांच्या राज्यानंतर सैतानाला कांही काळ मोकळे सोडिले जाईल अषासाठीं की त्याने खिस्ताचे नीतिमत्व व न्यायपूर्ण राज्य पाहावे. परंतु, सैतान राष्ट्रांतील लोकांना ठकवून एकदा परत देवाच्या पवित्र संतांबरोबर लढाई करण्याचा प्रयत्न करील. परंतु, परमेष्वर स्वर्गातून अग्नि पाठवून त्यांचा विध्वंस करेल. सैतान नेहेमीसाठीं नरकाग्नित टाकल्या जाईल.

### न्यायाचे मोठे पांढरे राजासन

सैतानाला अग्नीच्या सरोवरांत टाकिल्यानंतर, येषूखिस्त मृतांचा व राष्ट्रांचा न्याय नीतिमत्वाने करील. ज्यां कोणाचे नांव जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेले सापडणार नाहीं तो अग्निच्या सरोवरांत टाकला जाईल. ज्यांचे नांव जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेले असेल ते खिस्ताबरोबर नवे आकाष, नवी पृथ्वी व नवे यरुषलेम येथे सार्वकालिक जीवन जगेल. ह्या पुढें मरण नाही, षोक, रडणे,व कष्ट ही नाहींत.

आपल्या जीवनांत हे उद्धाराचे दान मी कसे मिळवू षकतो जेणेकरून मी सदैव खिस्ताबरोबर राहू षकेन ?

ह्यासाठी तुम्हांला येष ूखिस्तावर विष्वास ठेवावा लागेल. तुम्ही त्याला मनःपूर्वक ग्रहण करा, त्याने आपल्या पवित्र व मोलवान रक्ताने तुमचे पापक्षालन करण्याची विनंती करा, आणि खिस्ताला ग्रहणीय असे जीवन ह्यापुढें जगा. खाली लिहिलेली प्रार्थना करा ;प्रार्थना म्हणजे मनांतल्या मनांत देवाषी संवाद साधणेद्ध :

प्रभु येषू, माझ्या करिता व माझ्या पापांकरिता या जगांत येण्यासाठी धन्यवाद. मी जसा आहे तसाच तुमचा स्विकार करतो. माझ्या जीवनांत येउुन आपल्या मोलवान रक्ताने मला व माझ्या पापांना धूउुन टाका. माझ्या अंतःकरणांत सदैव वास करा, आणि मी तुमच्या सारखे पवित्र जीवन जगावे ह्यासाठीं माझी मदत करा. मी तुम्हास व तुमच्या पवित्रआत्म्याला आमंत्रित करितो कि माझ्या अंतःकरणांत येउुन मला आनंद, सुख, षांती व पापांपासून मुक्ति आणि बंधन व रोगमुक्ति मिळो. माझ्या सोबत असण्याच्या आष्वासनासाठी धन्यवाद. येषूच्या नांवांत ही प्रार्थना करतो, आमेन

जर तुम्ही खरोखर मनापासून ही प्रार्थना केली असेल तर तुम्हीं येषू खिस्ताचा तुमच्या जीवनांत स्विकार केला आहे. तुमचे नांव ''जीवनाच्या पुस्तकांत'' लिहिले जाईल. प्रभू तुमच्या बरोबर सदैव राहील. तो तुम्हांस सोडणार नाहीं व तुमचा त्याग करणार नाहीं.

जर तुम्हांला प्रार्थनेची गरज असेल किंवा येषू बद्दल जास्त माहिती हवी असेल तर तुम्हीं जवळच्या खिस्ती मंडळी/चर्च जे त्रैक परमेष्वर – ;परमेष्वर पिता, प्रभु येषू खिस्त, आणि पवित्रआत्माद्ध वर विष्वास ठेवतात त्यांच्यषी संर्पक साधा, किंवा आम्हाला

info@christforworld.org ह्या पत्यावर ई–मेल करा.